ISSN 2349-638x
Impact Factor 5.707

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

PEER REVIEW & INDEXED JOURNAL
Email id : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com

## SPECIAL ISSUE No.46

Executive Editor
Dr. S.M. Maner
Principal
Tuljabhavani Mahavidyalaya,
Tuljapur, Dist. Osmanabad (M. S.)

Co-Editor

Dr. T. L. Barbole
Head, Dept. of Economics

Prof. N. B. Kale
Head, Dept. of Commerce

Dr. B. W. Gund
Head, Dept. of Pol. Science

Prof. B. J. Kukade
Head, Dept. of Sociology

Chief Editor
Prof. Pramod Tandale

| | | | |
|---|---|---|---|
| 109. | महादेवी वैजनाथ फड<br>एस. टी. कावळे | जागतिकरणानंतर कृषीक्षेत्र | 298 |
| 110. | प्रा. बालाजी कांतीलाल नगरे<br>प्रा. नेताजी बालाजी काळे | जागतिकीकरण व विपणन | 301 |
| 111. | प्रा.डॉ. संतोष मारुती मेटकरी | जागतीकी करणाचे भारतीय शेतीवर झालेले परि□ाम | 305 |
| **POLITICAL SCIENCE** | | | |
| 112. | प्रा.डॉ. महादेव माणिकराव हारगे | जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने | 308 |
| 113. | प्रा.डी.वाय.साखरे<br>डॉ.महेश मोटे | जागतिकीकरण आणि भारतीय राजकीय व्यवस्था | 310 |
| 114. | ए.एन. भोसले | जागतिकीकरण व भारतापुढील आव्हाने | 312 |
| 115. | प्रा. डॉ. जगदीश देशमुख | जागतिकीकरण आणि भारताचे परराष्ट्र धोरण | 315 |
| 116. | प्रा. सुनिता शरद इंगळे | जागतिकीकरण आणि भारताचे परराष्ट्र धोरण | 317 |
| **SOCIOLOGY** | | | |
| 117. | प्रा.ए.जी.खोत | जागतिकीकरनानंतर सामाजिक समस्या | 318 |
| 118. | प्रा.सौ.एस.एस.कोरेकर | जागतिकीकरणानंतर महिला चहवळ | 320 |
| 119. | श्री दिपक रामराव निकाळजे | जागातिकीकरणानंतर भारतातील सामाजिक समस्या | 322 |
| 120. | डॉ. रमेश धोंडिराम राठोड | जागतिकीकरणानंतर सामाजिक संस्थेतील परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास | 324 |
| 121. | प्रा.बी.जे.कुकडे | जागतिकीकरणानंतर सामाजिक समस्या | 328 |
| 122. | Krushna Shivaji Kamble And<br>Tamboli Reshma Jahiroddin | New Industrial Policy: Features | 331 |
| 123. | Mr. Balasaheb J. Gaikwad<br>Dr. Pravin N. Totala | Women Entrepreneurship in India | 337 |
| 124. | Dr. N. B. Pawar | Globalization and Indian Society | 340 |

Aayushi International Interdisciplinary Research Journal ( AIIRJ ) | Special Issue No. 46 | ISSN 2349-638x

# जागतिकीकरण आणि भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने

प्रा.डॉ. महादेव माणिकराव ढारगे
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

जगामध्ये औद्योगिक क्रांतीमुळे व्यापार, उद्योग, संस्कृती, धर्म, मानवाचे एकमेकांशी असलेले संबंध इत्यादी बाबतीत अमुलाग्र बदल घडून आला. हा बदल 18 व्या शतकात ज्या देशामध्ये औद्योगिक क्रांती झाली तेथेच घडून आला. आधुनिकतेमुळे व्यक्तीमध्ये अद्ययावतता येऊन मूल्यप्रमाणक, विश्वास व्यवस्था एकूण जीवनात वैशिष्ट्यपूर्ण बदल झाला. दुसऱ्या महायुध्दानंतर जगाची सरळ-सरळ दोन भागात विभागणी झाली. त्यानंतरच्या काळात अमेरिकेत भांडवलशाही व्यवस्था स्वीकारली गेली. भारतासारख्या काही राष्ट्रांनी अलिप्ततेचा स्वीकार केला. 1989 मध्ये रशियाचे विघटन झाले आणि अमरेरिका जगामध्ये एक महासत्ताक देश म्हणून मिरवू लागला. जागतिक अर्थव्यवस्थेवर अमेरिकेने आपला प्रभाव निर्माण केला. परिणामी जागतिक अर्थव्यवस्थेत जे बदल झाले त्यांना आपण जागतिकीकरण म्हणून ओळखतो.

भारताने सुध्दा या जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी 1991 साली तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव आणि अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी जागतिकीकरणाच्या करार स्वाक्षरी धोरणाचा स्वीकार केला. भारतामध्ये जागतिकीकरणामुळे अनेक घटकावर याचा परिणाम झाला. खुल्या अर्थ व्यवस्थेमुळे जास्तीत जास्त नफा किंवा पैसा कसा कमवता येईल हे धोरण पुढे आले. परंतू औद्योगिक क्षेत्रातच नफा कमवता येत नसून अनेक वेगवेगळ्या मार्गाने नफा कमावण्याचा प्रयत्न भारतामध्ये सुरू झाला. तो म्हणजे 'भ्रष्टाचार' जागतिकीकरणाच्या नंतर जगातल्या अनेक देशात चांगले वाईट परिणाम झालेले दिसून येतात आणि त्या देशामध्ये वेगवेगळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत आणि तेच प्रश्न त्या देशातील शासन व्यवस्थेसमोरील आव्हाने निर्माण झाली आहेत.

भारतामध्ये जागतिकीकरणानंतर भारतीय लोकशाहीपुढे अनेक मोठ-मोठी आव्हाने उभी राहिली आहेत. उदा.प्रादेशिकवाद, धर्मवाद, भाषावाद, नक्षलवाद, पर्यावरणाची समस्या, दहशतवाद, जातीयवाद, वर्णभेद आणि भ्रष्टाचार इ.यापैकी आजस्थितीला भारतीय लोकशाहीपुढील एक मोठे आव्हाने म्हणजे ते भ्रष्टाचार कारण भ्रष्टाचाराने संपूर्ण भारत देश हा पोखरून निघाला आहे. असे कोणतेच क्षेत्र शोधूनही सापडणार नाही की जिथे भ्रष्टाचार झाला नाही. म्हणूनच भ्रष्टाचार हा आज भारतीय लोकशाही समोरील आव्हान बनला आहे.

सर्वात पहिल्यांदा राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होताना दिसत आहे. कारण राजकारणात प्रवेश झाला की माणूस श्रीमंत होतो असे बहुतांश लोक विचार करतात. कारण राजकारणाच्या आधी एखाद्या व्यक्तींकडे काही प्रमाणात संपत्ती असते परंतु राजकारणात काही पदे भोगली की त्याच्या संपत्तीमध्ये 10 ते 20 पटीने वाढ होत असते. असे प्रत्येक पक्षातील नेत्याकडे पाहिले की दिसून येते. याचे कारण काय आहे, तर तो आहे भ्रष्टाचार. राजकीय क्षेत्र भ्रष्टाचारामुळे ढवळून निघाले आहे. सर्वच राजकारणी भ्रष्ट आहेत असे म्हणता येणार नाही काही बोटावर मोजण्याइतके राजकारणी शुध्द चारित्र्याचे आहेत. भारतासारख्या लोकशाही प्रधान देशामध्ये राजकीय क्षेत्र भ्रष्टाचाराने बरबटलेले आहे. ज्या काही लोककल्याणकारी योजना निर्माण करणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे हे त्या देशाच्या शासकावर अवलंबून असते. जेवढा खर्च अनेक योजनांसाठी करायचा असतो तसा जर नाही झाला तर त्यात देशाचे नुकसान असते आणि भारतातही असेच आहे. म्हणून भारतात भ्रष्टाचार म्हणजे लोकशही समोरील आव्हान झाले आहे.

1955 मध्ये प्रशासकीय दक्षता उपविभागांची गृहखात्यांतर्गत निर्मिती करण्यात आली व या यंत्रणेवर काही जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या.

अ) भ्रष्टाचार विरोधी कृती करण्यास आवश्यक ते नेतृत्व आणि मार्गदर्शन पुरविणे आणि समन्वय साधणे.

ब) भ्रष्टाचारविरोधी कृती करण्यास आवश्यक ते नेतृत्व आणि मार्गदर्शन पुरविणे आणि समन्वय साधणे.

क) प्रत्येक विभाग आणि खात्याकडून या संदर्भात टिकाऊ आणि ठोस अशी कृती केली जाईल याची खात्री करून घेणे.

1957 मध्ये सार्वजनिक बांधकाम, गृहनिर्माण आणि पुरवठा या खात्यांतर्गत एक मुख्य तांत्रिक परीक्षकांची संघटना निर्माण करण्यात आली होती. या संघटनेचा हेतू असा होता की, खर्चात आर्थिक काटकसर साधणे आणि तांत्रिक व आर्थिक नियंत्रण अधिक चांगल्याप्रकारे ठेवणे या दृष्टिकोनातून केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभागाची एक सामाईक, तांत्रिक हिशोब तपासणी करणे.

भ्रष्टाचाराचा भारतीय राजकारणात कर्करोगापेक्षाही झपाट्याने प्रसार झाला असून निवडणुकांच्या राजकारणापासून लष्करासाठी लागणाऱ्या सामग्रीच्या खरेदीपर्यंतचे सर्व व्यवहार भ्रष्टाचाराच्या सावटाखाली आली आहेत. अनेक पक्षांच्या ज्येष्ठ नेत्यांच्या व मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराची मोठमोठाल्या रकमांची प्रकरणे वेशीवर टांगली गेली असून त्यात जणू उच्चांक गाठण्यासाठी स्पर्धाच लागली आहे. जयप्रकाश नारायण यांच्या समग्रक्रांतीने या सर्वांगीण भ्रष्टाचाराच्या विरोधातच तरुणांची चळवळ उभरण्याचा प्रयत्न केला होता. पण राज्यकर्त्यांनी त्या चळवळीला आणीबाणीचा प्रतिसाद दिला. भ्रष्टाचाराला त्यातून वेसन

घालणे दूरच राहिले, त्यांच्या विरोधात बोलणे हाच गुन्हा ठरायला लागला. राजकीय सत्तातिरेक, पोलिसी दमनसत्ता, भांडवलदार वर्चस्व, नोकरशाहीची मनमानी अशा अनेक नव्या अरिष्टांना आणीबाणीने पोसले तेव्हापासून रुळावरून घसरलेली भारतीय राज्यव्यवस्थेची गाडी अधिकाधिक भरकटत गेली. 1989 पासून तत्त्वशून्य आघाड्यांची सरकारे केंद्रात व राज्यात सत्तेवर आल्यामुळे भ्रष्टाचाराच्या पूर्वी कधीच नसलेल्या व नसतील तेवढ्या संधी चालून आल्या. नव्या आर्थिक धोरणाने मुक्त स्पर्धेचे तत्व अवलंबून विविधनिषेधशून्य व नैतिक वर्तनाला देशाच्या राजकारणात व अर्थकारणात प्रतिष्ठीत केले. यशस्वी होण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब क्षम्य ठरतो हे बाजारपेठी सुत्र आजच्या राज्यकारभाराचे मार्गदर्शक तत्व झाले असून संविधानातील मार्गदर्शक तत्त्वे अडगळीत पडली आहेत.

सत्तेचे खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण होणे आणि निर्णयसत्ता लोकांच्या हाती येणे हाच भ्रष्टाचाराला प्रभावी आळा घालण्याचा मार्ग असू शकतो. नागरी समाजाच्या आधारभूत मानल्या जाणाऱ्या सर्व संस्था या संदर्भात महत्वाची भूमिका पार पाडू शकतात. नागरीकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे, कोणत्या सोयीसुविधा त्यांना मिळायला पाहिजेत याची त्यांना कल्पना देणे, त्यांच्या हक्कावर संभवणारे धोके व त्यांना त्यांच्या न्याय हक्कापासून वंचित ठेवणाऱ्या प्रक्रिया यांची ओळख करनू देणे, लोकांच्या जीवन साधनांना अपायकारक ठरणाऱ्या खाजगी व सरकारी प्रकल्पांच्या विरोधात जनजागृती करणे, प्रशासनातील दोष, अपप्रवृत्ती व विकृती यांचा संघटीतपणे मुकाबला करण्याचे प्रशिक्षण जनतेला देणे अशी अनेक कामे नागरीक समाजाला आधारभूत ठरणाऱ्या संस्था करू शकतात. नागरी समाजातून दडपण आल्यावर प्रशासनाला पारदर्शक होण्याखेरीज पर्यायच उरणार नाही. गोपनीयतेच्या प्रशासकीय संस्कृतीनेच भ्रषचाराची व्याधी फोफावली आहे. भ्रष्टाचाराचे स्वरूप आज आपल्या देशात फार मोठे झाले आहे. जगामध्ये ज्या देशात भ्रष्टाचार भरपूर प्रमाणात झाला आहे त्या देशाची प्रगती निश्चितच झालेली नाही हे वास्तव विसरता काम नये. जागतिक बँकेत ठेवलेला ज्या-ज्या भारतीयांचा काळा पैसा आहे त्यावर शासनाला कडक पावले उचलावी लागतील नाहीतर निरव मोदी, चौक्सी, विजय माल्या असे जर अजून 100 भ्रष्टाचारी पैसे घेऊन परदेशात पळून गेले तर त्याचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर निश्चितच होतो. हे भारताच्या लोकशाहीपुढील एक गंभीर आव्हान बनल्याशिवाय राहणार नाही. वेळीच यावर सरकारने उपाययोजना कराव्यात व लोकशाही टिकवावी एवढीच अपेक्षा.

**संदर्भ :-**


1) डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, भारतीय गणराज्याचे शसन आणि राजकारण, पींपळापुरे बु.डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर

2) श्रीराम माहेश्वरी, भारतीय प्रशासन, ओरिएंटल लॉगमन, मुंबई

3) डॉ.पी.सी.श्रीवास्तव, 'भ्रष्टाचार' भारताचा अंतस्थ शत्रू, रोहन प्रकाशन, पुणे.


ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार'' – शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur'



# TULJABHAVANI MAHAVIDYALAYA, TULJAPUR,

**Tal- Tuljapur, Dist.Osmanabad-413601 (Maharashtra)**

**(Affiliated to Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)**

## Birth Centenary Year of Dr. Bapuji Salunkhe 2018-19

**One Day Interdisciplinary National Seminar on**

**"Social, Economical, Political and Commercial Challenges in the Post Globalization India"**

## CERTIFICATE

*This is to certify that Prof./Dr./Shri./Smt.* Harge Mahadev Manikrao of Venktesh Mahajan colg. o-bd *has participated in One Day Interdisciplinary National Seminar on Saturday, 9th February, 2019 as a Key Note Addressee/Chair Person /Resource Person / Participant. He/She has presented the paper entitled,* " "भारतीय लोकशाही पुढील आव्हाने." "

Dr. T. L. Barbole
Coordinator

Principal Dr. S. M. Maner
Convener